जलसंपदा विभागांतर्गत राबविण्यात येणा-या केंद्र सहाय्यित योजनांकरिता सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली(PFMS) राबविण्यासाठी बँक खाती उघडण्यास परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय शुद्धीपत्रक : पीएलएन-२०१७/प्र.क्र.२८५/निवसं-१
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक- २८ मार्च, २०१८

संदर्भ- शासन निर्णय क्रमांक- बीजीएम-१०.१७/११२/२०१७)/अर्थ-१ दि.१४.२.२०१८

प्रस्तावना:-

जलसंपदा विभागांतर्गत राबविण्यात येणा-या केंद्र सहाय्यित योजनांकरिता सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) राबविण्यासाठी बँक खाती उघडण्यास काही अटींच्या अधिन राहून संदर्भाधीन शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे. सदर बँक खात्यांतर्गत सुसूत्रता व स्पष्टता येण्यासाठी सदर शासन निर्णयातील अट क्र.२ व ३ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

शासन निर्णय शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन शासन निर्णयांतील अट क्र.२ सुधारीत करण्यात येत असून ती खालीलप्रमाणे वाचण्यात यावी.

अट क्रमांक २- नव्याने उघडण्यात येणाऱ्या महामंडळाच्या बँक खात्याअंतर्गत आहरण व संवितरण अधिकारी म्हणून संबंधित प्रकल्पांचे कार्यकारी अभियंता यांना वापरकर्ता (User) म्हणून जोडण्यात यावे. तसेच प्रकल्पांसाठी शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या उपलब्धतेनुसार एकुण शिल्लक रक्कमेपैकी प्रत्येक वापरकर्त्यास संवितरणाच्या मर्यादा महामंडळाने घालून द्याव्यात.

सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) राबविण्यासाठी State Project Implementation Unit व ई-प्रशासन मंडळ यांच्या मार्फत संयुक्तरित्या प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल.

२. संदर्भाधीन शासन निर्णयातील अट क्र.३ सुधारीत करण्यात येत असून ती खालीलप्रमाणे वाचण्यात यावी.

अट क्रमांक ३- सदर खात्यातील व्यवहार फक्त सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) व्दारेच होणार असल्याने, ज्यावेळी निधी खर्च करावयाचा असेल, त्यावेळी संबंधित अधीक्षक अभियंता यांची प्रचलित पध्दतीनुसार अनुदान विनियोगाची अनुमती प्राप्त झाल्यानंतर आहरण व संवितरण अधिकारी (संबंधित प्रकल्पांचे कार्यकारी अभियंता) यांनी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीवर (PFMS) लॉगिन (Login) करुन निधी वितरण आदेश (Fund Transfer Oder) तयार करावेत.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत (PMKSY) दि. ३१ मार्च,२०१८ पर्यंत प्राप्त झालेल्या रक्कमेपैकी उर्वरित रक्कम संबधीत दोन खात्यात (AIBP व HKKP) दि.५ एप्रिल,२०१८ पर्यंत वर्ग करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०३२८१६३३२४६०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Madhukar Belsare

Digitally signed by Sanjay Madhukar Belsare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=544e07f06fbab100dc2bfe33db79fc14350d78d6c16f8feab484d842c496717d, cn=Sanjay Madhukar Belsare
Date: 2018.03.28 16:34:52 +05'30'

(डॉ. संजय बेलसरे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
२. सचिव (प्रकल्प समन्वय) , जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ.
५. संचालक, (लेखा व कोषागारे), मुंबई .
६. संचालक, (सुधारणा), संचालनालय, लेखा व कोषागारे , नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला , मुंबई .
७. महालेखाकार कार्यालय, मुंबई / नागपूर
८. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
९. वित्त विभाग (व्यय -१२ / अर्थोपाय / कोषा प्रशा-५), मंत्रालय, मुंबई
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व पाटबंधारे विकास महामंडळे.
११. श्री. सुनिल मोने, तज्ञ वरीष्ठ वित्तीय सल्लागार, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. श्री. पद्मसिंह पाटील, सहाय्यक राज्य नोडल अधिकारी, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) , मुंबई .
१३. निवसं-१/संग्रहार्थ.